Research Papers

# विजापूर – आदिलशाहीची वैभवशाली राजधानी

*अनिल माणिकराव बैसाणे,*

इतिहास विभाग प्रमुख, झुलाल भिलाजीराव पाटील महाविद्यालय, धुळे.

**सांराश :**

सन १२०६ मध्ये दिल्लीमध्ये स्थापन झालेल्या सुलतानशाहीचा सन १५२६ मध्ये पाडाव झाला. काबुल नेता मोगल वंशीय बाबर याने दिल्लीचा सुलतान इब्राहिम लोदीचा पराभव करून दिल्लीमध्ये मोगल साम्राज्याची स्थापना झाली. हसन जाफर गंगू याने बहामनशहा ही पदवी धारण करून दक्षिणेत बहामनी राज्याची स्थापना केली. अनेक स्थित्यंतरानंतर तिसऱ्या महम्म्दाच्या कारकीर्दीत महम्मद गवान या पराक्रमी व मुत्सद्दी नेतृत्वाचा उदय झाला. त्यामुळे बहामनीचा मोठा विकास व विस्तार झाला.

## प्रस्तावना :

मात्र गवानच्या मृत्यूनंतर बहामनी राज्याचे तुकडे पडून पाच शाह्यांचा उदय झाला. त्यात वऱ्हाडला इमादशाही, बिदरला बरीदशाही, अहमदनगरला निजामशाही, गोवळकोडांला कुतुबशाही तर विजापुरला आदिलशाही अशा पाच शाह्या अस्तित्वात आल्या. युसूफ आदिलशहा हा विजापूरचा राज्यपाल होता. त्यानेच सन १४८९-९० मध्ये विजापूर येथे स्वतंत्र राज्याची स्थापना केली. तो महम्मद गवानचा जॉर्जियन गुलाम होता. आपल्या व्यक्तिगत गुणांनी व स्वकर्तृत्वाने तो उच्च पदास पोहचला होता.

## युसूफ आदिलशहा नंतरचे राज्यकर्ते :

त्याच्यानंतर मुलगा इस्माईल आदिलशहा सत्तेवर आला. पुढील काळात मल्लू, इब्राहिम आदिलशहा प्रथम, अली आदिलशहा प्रथम, इब्राहिम आदिलशहा द्वितीय, मोहम्मद आदिलशहा, अली आदिलशहा द्वितीय व शेवटी सुलतान सिकंदरशहा असे सत्ताधीश होवून गेलेत. अली आदिलशहा द्वितीय यांच्या कारकिर्दीत शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन करून आदिलशाहीस शह दिला होता. तर पुढे औरंगजेब बादशहाने सन १६८६ मध्ये विजापूर काबीज करून आदिलशाही नष्ट केली.[१]



## गोलघुमट :

विजापूरची ओळख मिनारांचे शहर म्हणून केली जाते. एवढेच नव्हे तर दक्षिण हिंदुस्थानातील आगरा म्हणूनही ओळखले जाते. आग्रामधील ताजमहाल आणि विजापूरमधील गोलघुमट ह्या ऐतिहासिद्ध वास्तु १७ व्या शतकात उभारल्या गेल्यात. आदिलशाही सुलतानांना अलिशान इमारती व बाग-बगीचे यांची विशेष आवड असल्याने विजापूर शहर परकोटसह महाल, मशीदी, बावड्या, मकबरे, बागबगिचे इत्यादींनी नटवले गेले. त्यामुळे विजापूरच्या वैभवात कालपरत्वे मोठी भरच पडत गेली. विजापूरी शिल्प हे उत्तर हिंदुस्थानातील इस्लामी शिल्पाकृतींपेक्षा वेगळे असून त्यावर भारतीय व तुर्की समन्वयाचा प्रभाव पडल्याचे दिसते. पाच शाह्या आणि विजयनगर साम्राज्य यांच्यात सन १५६५ मध्ये झालेल्या इतिहास प्रसिद्ध तालीकोटच्या लढाईने विजयनगरचा पराभव झाला. तेथील बहुतांश कारागीर विजापुरात आणून सुलतान अली आदिलशहाने

आपल्या विजयाच्या स्मरणार्थ एक मकबरा बनविला. हा मकबरा म्हणजेच प्रसिद्ध गोलघुमट होय. सर्वात सुंदर इमारत म्हणून गोलघुमटाचा उल्लेख केला जातो. ३० मीटर बाहेर व्यास असून ६० मीटरच्या चौथऱ्यावर घुमटाची वास्तु उभारण्यात आली आहे. मकबऱ्याच्या चारही कोनाड्यात सात मजली अष्टकोनी मीनार उभारल्या आहेत. मधला भाग मोकळा असून प्रत्येक मीनारीवर घुमटाला लागून परंतु स्वतंत्र लहान घुमट उभारण्यात आले आहेत. गोल घुमटाने रोमच्या सेंट पिटरपेक्षाही जास्त क्षेत्रफळ असलेली जागा व्यापून टाकली आहे. गोल घुमट स्थापत्य आणि शिल्प कलांचा उत्कृष्ट नमुना मानला जातो.[२]

### *जामी मशीद :*

देशातील सुंदर मशिदींपैकी विजापुरची जामी मशिद आहे. मशिदीत विविध दालनाची रचना कौशल्यपूर्ण स्थितीत करण्यात आली आहे. विजापूर शहरातील इमारती ह्या प्रामुख्याने अली इब्राहिम द्वितीय आणि मुहम्मदाच्या काळात जास्त करून इमारती उभारण्यात आल्याचे दिसते. येथील बारीक काम आकर्षक पद्धतीने बनविण्यात आले आहे. जामी मशीदीची लांबी १३७ मीटर असून रूंदी ६८.५ मीटर आहे. सात-सात मेहराबांच्या रांगा या आतील भागात चौकोनी आकाराचे आंगण आहे. दुसऱ्या एका मशिदीत साखळीसारख्या कड्या दगडात कोरल्या आहेत. त्यामुळेच या मशिदीस जंजीर मशीद म्हटले जात असावे. याचप्रमाणे आंडू मशीदसुद्धा प्रेक्षणीय आहे. तिच्या अंडाकृती आकारामुळे तिला आंडू मशीद असे म्हटले जाते. ही मशीद एक मजली असली तरी समोरून पाहतांना दोन मजल्याची असल्यासारखी वाटते. ह्या सर्व वास्तुंचे आपण बारकाईने निरीक्षण केले तर गोलघुमट हे विशेष आकर्षण वाटते. या सर्वच वास्तुवरील घुमट हे उमलत्या कमळाच्या पाकड्याच्या आधारावर दिसतात. ह्या पाकड्या व त्यावरील घुमटे यांचे नक्षीकामे अतीशय सुबक आणि आकर्षण बनविण्यात आले आहेत.[३]

### *गडकोटात प्राचीन बांधकामाचे अवशेष :*

आदिलशाही राज्याची स्थापना जरी मध्ययुगीन कालखंडात झाली असली, शहरातील वास्तु, कोट मध्ययुगीन स्थापत्य असले तरी त्यातील काही अंशी स्थापत्य शिल्पे ही प्राचीन कालीन असल्याची त्यांच्या अवशेषांवरून प्रचिती येते. याचाच अर्थ असा की, हा भुईकोट प्राचीनकालीन असावा. मात्र आदिलशाहीची स्थापना झाल्यावर किल्याबरोबरच इतर वास्तुंचाही विस्तार होत गेला असावा तसेच जीर्णोद्धार झाला असावा, असे वाटते. एक मात्र उघड दिसते की, जुने काम हिंदू शैलीच्या स्थापत्याचे आढळते. त्यात जुने बुरूज नव्याने बांधून किंवा दुरूस्ती करण्यात आली असावीत. म्हणजे आदिलशाहीची स्थापना होण्यापूर्वीच या शहराला कोट असावा असे वाटते.[४]

विजापुरचा हा कोट सर्वात मोठा कोट असून तो युसूफ आणि पहिल्या अली आदिलशहाच्या काळात बांधला गेला. हा कोट १० ते ११ चौ.कि.मी. असून त्याची पूर्व-पश्चिम लांबी ४ कि.मी. आणि उत्तर-दक्षिण लांबी ३.५ कि.मी. आहे. कोट अनेक सत्ताधीशांच्या काळात बांधला गेल्याने एकसारखेपणा आढळत नाही. रूंदी १२ मीटर तर उंची १० मीटर असून ६० ठिकाणी बुरूजांची उभारणी करण्यात आली आहे.

परकोटाच्या बाहेरच्या बाजुला खोल खंदक होता. आज मात्र हा खंदक भरला गेल्याने त्याचे अस्तित्व दिसत नाही. कोटास असलेल्या मक्का गेट व शाहपूर गेटच्या दरम्यान एकूण पाच दरवाजे आहेत. प्रत्येक गेटच्या दोन्ही बाजूंना बुरूज ठेवण्यात आले आहेत. या सर्व दरवाज्यांमध्ये शाहपूर गेट भव्य आकाराचे आहे. दरवाजाला २.६५ मीटर रूंद लोखंडाचे टोकदार मोठे खिळे लावण्यात आले आहेत. जेणेकरून हत्तीच्या धक्क्याने दरवाजे तोडता येवू नयेत असा उद्देश होता.[५]

### *भव्य पितळी तोफ :*

मुख्य परकोटाच्या आतील भागात अनेक बुरूज आहेत. यात काही ठिकाणी तोफा ठेवण्यात आल्या असून काही बुरूजांचा उपयोग टेहळणी बुरूज म्हणून वापर होत असावा. परकोटाच्या आत दगडांचा गोल उंच बुरूज बांधण्यात आला असून त्याला वर जाण्याकरिता गोलाकार पद्धतीने पायऱ्या बनविल्या आहेत. त्या पायऱ्यांवरून एकदम वर जावून बुरूजांच्या उंचीमुळे सर्व परिसरावर देखरेख ठेवता येत होती. या व्यतिरिक्त अली बुरूज, हैदर बुरूज, शारजा बुरूज विशेष करून भव्य आहेत. शारजा बुरूजावर तर मलिक ए मैदान नावाची भव्य तोफ आजही दुर्ग प्रेमीकरीता या बुरूजांवर ठेवण्यात आली आहे. पाच मीटर लांबीच्या या तोफेचे वजन ४० टन आहे. पितळी धातुंपासून बनविण्यात आलेल्या या तोफेची अडीच फूट आकाराचा गोळा डागू शकण्याची क्षमता होती. यावरून तोफेचा परीघ आणि तिच्या भव्यतेची कल्पना येते.[६]



